शासनातर्फे ज्या शासकीय जमिना कृषि प्रयोजनासाठी नव्या शर्तीने ( म्हणजे भोगवटा-दार वर्ग-२ म्हणून ) प्रदान केलेल्या आहेत अशा भोगवटादारांना राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्जे मिळण्याबाबत येणा-या अडवणीबाबत -

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग १८७२४४
शासन परिपत्रीक क्रमांक एलएनडी-१०८८/[illegible]/सीआर ५१/ज-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक १७ जुलै १९९०

परिपत्रक

वर्ग-२ म्हणून धारण केलेल्या शासकीय जमिनीचे भोगवटादार, सहकारी बँका/भूविकास बँका किंवा भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम १९६६ च्या कलम ३ अन्वये प्रस्तावित केलेल्या भारतीय स्टेट बँक किंवा बँकांचा व्यवहार करणा-या कंपन्यांबाबत [ उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण ] अधिनियम १९७० याचे कलम २, खंड[ड] च्या अर्थानुसार तत्सम नवीन बँक किंवा संबंधित कायद्यान्वये प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचेकडून जमिनीच्या तारणावर कर्जे घेवू शकतात अशी तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६[४] मध्ये केलेली आहे. उक्त तरतूदीप्रमाणे वर नमूद केलेल्या वित्तीय संस्थाकडून कर्जे मिळविण्याकरिता जर जमिनी गहाण ठेवण्याचे झाल्यास त्याकरिता जिल्हाधिकारी किंवा शासन यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता रहात नाही. तसेच, घेतलेल्या कर्जाची परतफेड जर हे जमीन धारक करु शकले नाहीत तर तारण ठेवलेल्या जमिनीची विल्हेवाट लावण्याची मुभाही उक्त तरतूदीप्रमाणे बँकांना व अन्य वित्तिय संस्थाना देण्यात आलेली आहे.

२. वरील प्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये तरतूद असताना सुध्दा राष्ट्रीयकृत बँका देत नाहीत. तसेच जमिनीच्या अभिलेख्याच्या ७/१२ च्या उता-याच्या झेरॉक्स प्रती स्वीकारल्या जात नाहीत. अशा प्रकारच्या अडचणी, वर्ग -२ च्या जमीन धारकांना येतात, असे शासनाच्या निदर्शनास आल्यावरून सदर बाब दि. २८-१२-१९८९ रोजी पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या ३९ व्या बैठकीत उपस्थित करण्यात आली होती. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी बँकांच्या [illegible] प्रतिनिधींनी वर्ग-२ च्या जमीन धारकांना कर्जपुरवठा करण्यात बँकांकडून कोणत्याही अडचणी येणार नाहीत असे स्पष्टीकरण केलेले आहे. मात्र वर्ग-२ च्या जमीन धारकांना पट्टयाने ज्या जमिनी दिल्या आहेत, त्या बँकांकडे गहाण ठेवून बँकांनी त्यांच्या थकबाकीच्या वसूलीसाठी हर

जमिनी विकू शकतात असे गृहीत धरून बँकांच्या प्रतिनिधींनी वरील स्पष्टीकरण केलेले आहे.

३. वरील वस्तुस्थिती सर्व जिल्हाधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात येत असून वर्ग-२ च्या जमीन धारकांना पत - पुरवठ्याबाबत राष्ट्रीयकृत बँकांकडून अथवा इतर वित्तीय संस्थांकडून जर काही अडचणी येत असल्याच्या तक्रारी असल्या तर अशी प्रकरणे संबंधित बँकांच्या / वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींनी नेमून वर्ग-२ च्या जमीन धारकांना वेळीच पत पुरवठा होईल असे पहावे व त्यांना दिलासा द्यावा. सदर सूचना जिल्हाधिका-यांनी त्यांच्या आधिपत्याखालील सर्व संबंधित क्षेत्रीय अधिका-यांच्या नजरेस आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

[ रा. वा. आडिवरेकर ]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति

Scanned by CamScanner

नाशक म्हणून किंवा फूळ म्हणून धारण केलेली एकूण जमीन ही कलम ३६अ, पोटकलम (६) च्या अर्थानुसार निर्वाहक क्षेत्रापेक्षा अधिक होणार नाही.]

कलम ३६ (४) (४) पोटकलम (१) मध्ये किंवा या संहितेच्या इतर कोणत्याही उपबंधांमध्ये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, भोगवटादार-वर्ग दोन याने, भूमी सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३, शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ किंवा मुंबईचा बिगर शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ या अन्वये राज्यशासनाने त्यास दिलेल्या कर्जाबद्दल राज्यशासनाच्या नावाने किंवा सहकारी संस्थेने [१][किंवा भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या भारताच्या स्टेट बँकेने किंवा बँकांच्या व्यवहार करणाऱ्या कंपन्यांबाबत (उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७० याचे कलम २ खंड (ड) च्या अर्थानुसार, तत्सम नवीन बँकेने किंवा संबंधित कायद्यान्वये प्रस्थापित केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] त्यास कर्जाबद्दल उक्त सहकारी संस्थेच्या नावाने [२][भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा यथास्थिती, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या नावाने आपली मालमत्ता गहाण ठेवणे कायदेशीर असेल आणि असे कर्ज ज्या अटीवर देण्यात आले असेल त्या अटीनुसार अशी कर्जाची परतफेड करण्यात अशा भोगवटादाराने कसूर केल्यास, राज्यशासनास किंवा [१][सहकारी संस्थेस, भारताच्या स्टेट बँकेस तत्सम नवीन बँकेस किंवा यथास्थिती महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास] जी इतर कोणतीही उपाययोजना करता येईल त्यास बाध न आणता राज्यशासनाने किंवा [१][यथास्थिती, सहकारी संस्थेने, भारताच्या स्टेट बँकेने, तत्सम नवीन बँकेने किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] वहिवाट जप्त करवून तिची विक्री करविणे आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न अशा कर्जाच्या फेडीसाठी वापरणे हे कायदेशीर असेल.

जिल्हाधिकाऱ्यास, [३][सहकारी संस्था, भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा

Scanned by CamScanner